## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.६०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०८/२०१७

**१)अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०८/२०१७ चे १७.३० वा. पर्यंत यातील आरोपीने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी हिचे सोबत जबरीने शारीरीक अत्याचार करून ती ५ महीन्याची गर्भवती झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम ३७६,(२)(न) भांदवि. सहकलम ४ बा.लै. अ.प्र.कायदा २०१२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.मेश्राम पो.स्टे कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) सोन्याच्या दागिन्यांची चोरी :–**

दिनांक २६/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादी मोकळन गोपींचद वैद्य वय ४२ वर्ष रा. मांगली याने उघळया घरासमोरील पडवीत शिलाई मशिनवर काढुन ठेवलेले १२ ग्रॅम सोन्याचा गोप, सोन्याचे रिंग साडेचार ग्रॅम, सोन्याचा मुखडा साडेपाच ग्रॅम असा एकुण ३८,०००/रु चे दागीने यातील संशयीत आरोपीने चोरून नेले असावे असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम ३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पो.स्टे पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अज्ञात वाहन चालकाच्या हयगयीने महीलेस धडक मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २७/०८/२०१७ चे १९.१५ वा. दर. यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन जखमी वेळसर महीला सौ. सुशिला दंडारे वय ५० वर्ष रा. कुर्झा हिला धडक मारून जखमी करून अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी सौ. गिता सुभाष वैरागडे वय २६ वर्ष रा. वाही यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे २७९,३३७भादंवि. सहकलम १३४,१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**४) अल्पवयीन मुलीला पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २६/०८/२०१७ चे २०.०० वा. दर. यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १६ वर्ष ही घरी पिण्याचे पाणी भरण्याकरीता जाते म्हणुन निघुन गेली परत आली नाही तीचा शोध घेतला असता मिळुन आली नाही फिर्यादीचे तोंडी तक्रारी वरुन तसचे मुलीचे वय १८ वर्षा पेक्षा कमी असल्याने व शासनाचे परीपत्रक अन्वये पोलीस स्टेशन पवनी येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**५) अल्पवयीन मुलगा पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०८/२०१७ चे १०.०० ते १०.३० वा. दर. यातील फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा वय १६ वर्ष हा घरी कोणालाही न सांगता घरुन निघुन गेल्याने मुलगा हा अल्पवयीन असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**६) भांडण करुन डोक्यावर पावडयाचे दांडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/०८/२०१७ चे १३.०० वा. दर. यातील फिर्यादी नितेश शिवनाथ बोरकर वय ३० वर्ष, रा. नवीन टाकळी झोपडपटटी भंडारा हा मजुरीचे कामाकरीता गांधी चौक भंडारा येथे उभा असता यातील आरोपीने फिर्यादीला म्हटले की तु सट्टा घेतोस व दादा बनलास का असे का मनालास या कारणावरुन भांडण करुन फिर्यादीचे डोक्यावर पावडयाचे दांडयाने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाणे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**७) कन्टेनरच्या धडकेत एक जखमी . :–**

दिनांक २७/०८/२०१७ चे १८.३० वा. दर. यातील जखमी जागेश्वर आंनदराव पंचबुधे वय ४५ वर्ष, रा. कवडसी हा सायकलने पुर्नवसन पिंपरी येथे रोड क्रॉस करीत असतांनी यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे सायकला धडक मारुन खाली पडुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चंदन रामदास वासनीक वय ४० वर्ष, रा. कवडसी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे जवाहरनगर हे करीत आहेत.

**८) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक २७/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, मोहाडी, गोबरवाही व पालांदुर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३७ लिटर हातभटटी दारु + ४०० किलो सडवा + साहित्य किंमती ३२७५०/–रु. ३ लिटर २४० मिली लिटर देशी दारु किंमती ९३६/–रु. असा एकुण किमती ३३६८६/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता